**"सुंदर माझे कार्यालय" या अभियानाची कार्यपध्दती तयार करण्यासाठी समिती गठित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : प्रसुधा १६२१/प्र.क्र. ११ (भाग 2)/१८ अ**
**हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक:- १८ मे, २०२१.**

वाचा: शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रसुधा १६२१/प्र.क्र. ११ /१८ अ दि. १८ मे, २०२१

**<u>प्रस्तावना:</u>** राज्यातील प्रत्येक कार्यालय हे स्वच्छ, सुंदर व नीटनेटके असावे तसेच तेथील वातावरण नागरिकांसाठी सुलभ व कर्मचाऱ्यांसाठी काम करण्यायोग्य, प्रेरक, उत्साहवर्धक असावे यासाठी राज्यस्तर ते तालुका स्तरावर "सुंदर माझे कार्यालय" अभियान पुढील आर्थिक वर्षापासून प्रत्येक वर्षी दि. १ जानेवारी ते ३१ मार्च, १ मे ते ३१ जुलै व १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर अश्या तीन टप्प्यात राबविण्यास संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद ४ मध्ये या अभियानाची तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावरील पूर्वतयारी, अभियानाची विस्तृत रुपरेषा, अवलंब करावयाची कार्यपध्दती, तसेच अभियानातंर्गत पुरस्काराची निवड करताना विविध स्तरावरील पुरस्कार निवड समित्या, पुरस्कारासाठी विविध स्तरावर विचारात घ्यावयाच्या बाबी व अभियानाची मूल्यांकन पध्दती याबाबत मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी श्री. सुनील केन्द्रेकर, विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात येत आहे. या समितीने या अभियानाबद्दल विस्तृत अहवाल दोन महिन्यात शासनाला ( राज्य स्तरीय समितीला ) सादर करावा असे नमूद केले आहे.

**<u>शासन परिपत्रक:-</u>**

उपरोक्त पार्श्वभूमीवर "सुंदर माझे कार्यालय" या अभियानाची तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावरील पूर्वतयारी, अभियानाची विस्तृत रुपरेषा, अवलंब करावयाची कार्यपध्दती, तसेच अभियानातंर्गत पुरस्काराची निवड करताना विविध स्तरावरील पुरस्कार निवड समित्या, पुरस्कारासाठी विविध स्तरावर विचारात घ्यावयाच्या बाबी व अभियानाची मूल्यांकन पध्दती याबाबत मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी श्री. सुनील केन्द्रेकर, विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.सुनील केन्द्रेकर, विभागीय आयुक्त (औरंगाबाद) | अध्यक्ष |
| २. | सह/उपसचिव(महसूल) | सदस्य |
| ३. | सह/उपसचिव(नगरविकास) | सदस्य |
| ४. | सह/उपसचिव(ग्रामविकास) | सदस्य |
| ५. | सह/उपसचिव(रचना व कार्यपध्दती) | सदस्य |
| ६. | महासंचालक, यशदा, पुणे | सदस्य |
| ७. | उपआयुक्त(सामान्य), औरंगाबाद | सदस्य सचिव |

२. या समितीमध्ये आवश्यकता भासल्यास समितीच्या अध्यक्षांच्या सहमतीने एखाद्या जिल्हयातील जिल्हाधिकारी यांची सदस्य म्हणून नेमणूक करता येईल.

३. उपरोक्त समितीने यासंदर्भात वेळोवेळी आयोजित करावयाच्या बैठकांबाबतची (आवश्यकतेनुसार दूरचित्रवाणी माध्यमाद्वारे) कार्यवाही त्यांच्यास्तरावर करुन या अभियानाबाबतचा विस्तृत अहवाल दोन महिन्यात शासनाला(राज्यस्तरीय समितीला) सादर करावा.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२१०५१८१७१२०८८९०७ असा आहे.

५. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( महेंद्र ब.वारभुवन )**
**सहसचिव, प्र.सु.व र.व का.**

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव (५ प्रती) पत्राने
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
८. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव(५ प्रती), मंत्रालय, मुंबई ४०००३२.
९. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१०. सर्व मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
११. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१२. सचिव, राज्य निवडणूक आयोग (पत्राने), १३ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई ४०० ०३२.
१३. मा.महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, मा.मुंबई उच्च न्यायालय
१४. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१५. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१६. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा )-१, महाराष्ट्र, मुंबई
१७. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा )-२, महाराष्ट्र, नागपूर
१८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
१९. महाप्रबंधक, मा.मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
२०. प्रबंधक, मा.मुंबई उच्च न्यायालय,( मूळ शाखा ), मुंबई
२१. प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, १ला मजला, नवीन प्रशासकीय इमारत,

मुंबई ४०० ०३२

२२. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने), बँक ऑफ इंडीया इमारत, मुंबई २३

२३. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई

२४. मा.मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई

२५. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे

२६. सर्व विभागीय आयुक्त,

२७. सर्व जिल्हाधिकारी,

२८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

२९. सर्व महानगरपालिका आयुक्त ,

३०. सर्व पोलीस आयुक्त / सर्व पोलीस अधीक्षक,

३१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

३२. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई

३३. कक्ष अधिकारी, कार्यासन अर्थ-१/व्यय-४/विसु.१, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई-३२

३४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)

३५. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२०.

३६. इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०००२५.

३७. नॅशनलीस्ट काँग्रेस पार्टी, ठाकरसी हाऊस, जे.एन.हेरेडीया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०००३८.

३८. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००२८.

३९. बहुजन समाज पार्टी, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी.एस.जी.भवन, प्लॉट नं. ८३-अे, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई-४०००१४.

४०. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई ४००००४.

४१. भारतीय कम्युनिस्ट(मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई ४०००१३.

४२. महाराष्ट्र नवनिर्माण सेवा, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०००२८.

४३. सर्व मंत्रालयीन विभाग (त्यांना विनंती करण्यात येते की, हे परिपत्रक आपल्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणण्यात यावे)

४४. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई ४०००३२.

४५. निवड नस्ती (का.१८अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.